आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

२५ नोव्हेंबर २०२४ - सोमवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- संसदेचं हिवाळी अधिवेशन सुरु /पहिल्याच दिवशी अदानी प्रकरणावरुन गदारोळ/ दोन्ही सदनांचं कामकाज दिवसभरासाठी तहकूब

- राज्यात मुख्यमंत्रीपदासंदर्भात अद्याप निर्णयाची प्रतीक्षा

- गेल्या दहा वर्षात ५ लाख रेल्वे कर्मचाऱ्यांची भर्ती पारदर्शक पद्धतीनं झाल्याचं रेल्वेमंत्र्यांचं नागपुरात प्रतिपादन

- नवी दिल्लीत जागतिक सहकार परिषदेचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते उद्घाटन /भविष्यात भारताच्या विकासात सहकार क्षेत्राचा सिंहाचा वाटा असेल, असा प्रधानमंत्र्यांना विश्वास

**आणि**

- पहिल्याच सामन्यात ऑस्ट्रेलियाचा २९५ धावांनी धुव्वा उडवत भारताची बॉर्डर गावस्कर करंडक कसोटी क्रिकेट मालिकेत विजयी सलामी

<><><><><>

संसदेचं हिवाळी अधिवेशन आज सुरु झालं. पहिल्याच दिवशी अदानी उद्योग समूहाच्या कथित लाचखोरी प्रकरणावरून गदारोळ झाल्यानं संसदेच्या दोन्ही सभागृहाचं कामकाज दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं.

लोकसभेत सुरुवातीला वसंतराव चव्हाण, हरिश्चंद्र चव्हाण आणि इतर दिवंगत सदस्यांना आदरांजली वाहून कामकाज काही काळ तहकूब करण्यात

आलं. पुन्हा कामकाज सुरू झाल्यानंतर विरोधी पक्षाच्या सदस्यांनी कथित लाचखोरी प्रकरणाबरोबरच, उत्तर प्रदेशातल्या संभल इथल्या हिंसाचार प्रकरणावरून गदारोळ केल्यामुळे पीठासीन अधिकाऱ्यांनी सभागृहाचं कामकाज दिवसभरासाठी तहकूब केलं.

राज्यसभेतही दिवंगत आजी-माजी सदस्यांना आदरांजली वाहण्यात आली. कथित लाचखोरी प्रकरणावरून विरोधकांनी स्थगन प्रस्तावाची मागणी केली होती, ती अध्यक्ष जगदीप धनखड यांनी फेटाळून लावली. भारतीय संविधानाला यंदा ७५ वर्षं पूर्ण होत आहेत, त्यामुळे संसद सदस्यांनी लोकांसमोर उच्च आदर्श प्रस्थापित करावेत, अशी अपेक्षा धनखड यांनी व्यक्त केली. राज्यसभेचे विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खर्गे तसंच डावे पक्ष, द्रमुक, राजद, आप यांच्या सदस्यांनी अदानी समूहावरच्या आरोपाबाबत बोलायचा प्रयत्न केला, मात्र त्यांना परवानगी नाकारण्यात आली. संविधानदिनानिमित्त उद्या दोन्ही सभागृहांचं कामकाज होणार नाही.

**<><><><><>**

संसदेच्या हिवाळी अधिवेशनात विधायक चर्चा होईल, अशी आशा प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केली आहे. ते आज अधिवेशन सुरू होण्याआधी प्रसारमाध्यमांशी बोलत होते. भारतानं संविधान स्वीकारून ७५ वर्षे झाली आहेत हे यंदाचं वैशिष्ट्य असून यासह अनेक कारणांसाठी हे अधिवेशन विशेष असेल, असं ते म्हणाले. यावेळी प्रधानमंत्र्यांनी विरोधकांवर टीका केली. मतदारांनी सत्ता द्यायला नकार दिलेले मूठभर लोक संसदेत विनाकारण गोंधळ करतात, असं ते म्हणाले.

संसदेतल्या वेळेचा उपयोग देशाची प्रतिष्ठा जगात वाढवण्यासाठीच करायला हवा, अशी अपेक्षा प्रधानमंत्र्यांनी व्यक्त केली. देशातल्या मतदारांचा संविधानाबद्दलचा विश्वास, लोकशाहीविषयीची वचनबद्धता यांना काही अर्थ आहे, असा संदेश संसदेतून जायला हवा, असं ते म्हणाले.

<><><><><>

विधानसभा निवडणुकीत भाजपा, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस या तिन्ही पक्षांनी एकत्र म्हणून काम केलं, त्यामुळे यशाचं श्रेय या तिघांना एकसमान आहे, असं राष्ट्रवादी काँग्रेसचे खासदार प्रफुल पटेल यांनी म्हटलं आहे. संसद परिसरात ते  प्रसारमाध्यमांशी बोलत होते.  तिन्ही पक्षांचे नेते एकत्र चर्चा करुन मुख्यमंत्रीपदाविषयी निर्णय घेतील आणि त्यामुळे यावरून संघर्ष निर्माण होणार नाही, असंही ते म्हणाले.

<><><><><>

विधानसभा निवडणुकीचे निकाल जाहीर झाल्यानंतर राज्यात सत्तास्थापनेबाबत विविध पातळ्यांवर चर्चा सुरु आहे. महायुतीतल्या शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस या दोन्ही पक्षांच्या विधिमंडळ पक्षांच्या नेत्यांची निवड झाली आहे. शिवसेनेच्या गटनेतेपदी विद्यमान मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची, तर राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेतेपदी अजित पवार यांची निवड कालच झाली. मात्र भाजपा विधिमंडळ पक्षाची नेतानिवड अद्याप बाकी आहे. भाजपा विधिमंडळ पक्षाची बैठक आज होणार असून ती झाल्यावर मुख्यमंत्रिपदाबाबतचा निर्णय होईल, असं अजित पवार यांनी आज सातारा जिल्ह्यात कराड इथं सांगितलं. माजी मुख्यमंत्री आणि देशाचे माजी

उपप्रधानमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या पुण्यतिथीनिमित्त कराड इथल्या त्यांच्या स्मृतिस्थळावर पवार त्यांनी आदरांजली वाहिली.

<><><><><>

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या विधिमंडळ गटनेतेपदी आमदार आदित्य ठाकरे यांची निवड करण्यात आली. तसंच विधानसभेच्या गटनेतेपदी आमदार भास्कर जाधव यांची तर प्रतोदपदी आमदार सुनील प्रभू यांची निवड झाल्याची माहिती विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी दिली.

<><><><><>

संविधानाचा सन्मान केवळ संविधानाचं पुस्तक दाखवून होत नाही तर संविधानाचा सन्मान नतमस्तक होऊन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केला होता, असं रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी आज सांगितलं. ते नागपूर इथं अखिल भारतीय अनुसूचित जाती- अनुसूचित जमाती रेल्वे कर्मचाऱ्यांच्या राष्ट्रीय अधिवेशनात बोलत होते.

२००४ ते २०१४ या १० वर्षात रेल्वेमधे ४ लाख ४० हजार कर्मचाऱ्यांची भर्ती झाली होती परंतु २०१४ ते २०२४ या दहा वर्षाच्या काळात ५ लाख रेल्वे कर्मचाऱ्यांची भर्ती पारदर्शक पद्धतीनं झाली आहे. या भर्तीसाठी एक वार्षिक कॅलेंडर सुद्धा रेल्वेनं पहिल्यांदाच तयार केलं असल्याचं त्यांनी सांगितलं.

<><><><><>

भविष्यात भारताच्या विकासात सहकार क्षेत्राचा सिंहाचा वाटा असेल, असा विश्वास प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज व्यक्त केला. नवी दिल्ली इथे भारत मंडपम इथे आंतरराष्ट्रीय सहकार परिषदेचं उद्घाटन केल्यानंतर ते बोलत होते. सहकार क्षेत्र म्हणजे भारतीय संस्कृतीचा पाया आहे, असं ते म्हणाले. भारतात सहकारी संस्थांची संकल्पना ही आता चळवळ बनली आहे, असं मत त्यांनी व्यक्त केलं. सहकारी संस्थांना बहुउद्देशीय आणि बळकट बनवण्याचा आपला प्रयत्न करणार असून त्यासाठी दोन लाख गावांमधे सहकारी संस्था स्थापन करण्याचा विचार असल्याचं ते म्हणाले.

प्रधानमंत्र्यांच्या हस्ते आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष २०२५ निमित्त एका विशेष टपाल तिकीटाचं प्रकाशनही झालं. या वेळी भूतानचे प्रधानमंत्री दाशो शेरिंग तोबगे, फिजीचे उप प्रधानमंत्री मनोआ कामिकामिका आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा उपस्थित होते. आंतरराष्ट्रीय सहकार संघटनेच्या गेल्या १३० वर्षांच्या इतिहासात पहिल्यांदाच ही परिषद भारतात होत आहे.

**<><><><><>**

देशाच्या संविधानाचा अमृतमहोत्सव यंदा साजरा करण्यात येणार आहे. उद्यापासून २५ नोव्हेंबर २०२५ पर्यंत वर्षभर त्याअंतर्गत विविध कार्यक्रम होतील. संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी आज नवी दिल्ली इथं प्रसारमाध्यमांना या बाबतची माहिती दिली. दिल्लीतल्या संविधान सदनाच्या मध्यवर्ती सभागृहात एक भव्य कार्यक्रम आयोजित करण्यात आला असून राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू त्यावेळी संसदेच्या दोन्ही सभागृहांच्या संयुक्त बैठकीला संबोधित करतील. हा उत्सव देशाचा असून

नागरिकांनी त्यात उत्साहानं सहभागी व्हावं, असं आवाहन रिजिजू यांनी केलं.

<><><><><>

संविधान सभेतल्या वादविवादापासून प्रेरणा घेत सभागृहाच्या सदस्यांनी संसदेच्या शिष्टाचाराचं पालन करावं, असं आवाहन लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांनी आकाशवाणीला दिलेल्या विशेष मुलाखतीत केलं. संविधान हे प्रत्येक नागरिकाचं असून त्यावर देशातल्या सर्व नागरिकांचा विश्वास असल्याचं त्यांनी अधोरेखित केलं.

-<><><><><>

बॉर्डर- गावस्कर करंडक कसोटी मालिकेतल्या पहिल्या क्रिकेट सामन्यात आज भारताने ऑस्ट्रेलियावर दणदणीत विजय मिळवला. त्यामुळे भारताने पाच सामन्यांच्या मालिकेत १- शून्यने आघाडी घेतली आहे. ऑस्ट्रेलियात पर्थ इथं झालेल्या सामन्यात भारतानं यजमान संघाला २९५ धावांनी धूळ चारली. हा विजय भारताचा सगळ्यात मोठ्या कसोटी विजयांपैकी एक ठरला. भारताचा कर्णधार जसप्रित बुमरा आणि मोहम्मद सिराज  यांनी प्रत्येकी तीन गडी बाद केल्यामुळे ऑस्ट्रेलियाचा दुसरा डाव केवळ २३८ धावांमधे गुंडाळला गेला. तत्पूर्वी विराट कोहलीची नाबाद शतकी खेळी आणि यशस्वी जयस्वालच्या १६१ धावांच्या दमदार खेळाने भारताने ऑस्ट्रेलियासमोर विजयासाठी ५३४ धावांचं मोठं आव्हान ठेवलं होतं. बुमरा सामनावीर ठरला. दुसरा कसोटी सामना ६ डिसेंबरपासून अडलेड इथे सुरू होईल.

**<><><><><>**

नयी चेतना 3.0 मोहिमेअंतर्गत १४ राज्यांमधील २२७ लिंगभाव संसाधन केंद्राचं आज केंद्रीय ग्रामीण विकास मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी नवी दिल्लीत उद्घाटन केलं. ही मोहिम २३ डिसेंबरपर्यंत सर्व राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये चालणार आहे. **एक साथ, एक आवाज, हिंसा के खिलाफ** असं या मोहिमेचं घोषवाक्य आहे.

**<><><><><>**

गेल्या चोवीस तासात, कोकण आणि मध्य महाराष्ट्रात काही ठिकाणी, तर मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी किमान तापमानात किंचित घट झाली. राज्यात सर्वात कमी किमान तापमान महाबळेश्वर इथं १२ अंश सेल्सिअस इतकं नोंदवलं गेलं.

येत्या दोन दिवसात राज्यात हवामान कोरडं राहिल, असा पुणे वेधशाळेचा अंदाज आहे.

//<><><><><>//